महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education

**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001**

e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

परीक्षा प्राधान्य

पत्र क्रमांक :नाविमं /गोउमा / 804

नागपूर, दिनांक 05/ 03/2024

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्य व उच्च माध्य विद्यालय,
नागपुर विभाग,नागपुर

विषय :— माध्यमिक व उच्च माध्य प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च 2024
उत्तरपत्रिकांचे परीक्षण व नियमक करणेबाबत.

संदर्भ :— 01)शिक्षण समन्वय संघ यांचे क. महा.व शिक्षणाधिकारी यांचे मार्फत दि.02.02.2024 पर्यत प्राप्त पत्रान्वये.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरून सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या प्राचार्य / मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि. 21 फेब्रु 2024 ते 19 मार्च 2024 आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि .01 मार्च 2024 ते 26 मार्च 2024 या कालावधीत लेखी परीक्ष घेण्यात येत आहेत. काही शिक्षक संघटनांनी शासनांकडुन विविध मागण्या मान्य होईपर्यंत सदर परीक्षेतील उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकलेला आहे, असे पत्र या कार्यलयास प्राप्त झालेले आहेत.

तरी आपल्या माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालय परीक्षण / नियमनासाठी आपल्या नावे पाठविण्यात आलेले उत्तरपत्रिकांचे बंडल / पार्सल पोस्टामार्फत प्राप्त झाल्यास ते सोडवुन घ्यावेत व परीक्षक / नियामक यांचेकडुन परीक्षण व नियमक करून घ्यावेत. जे परीक्षक / नियामक बहिष्कारामध्ये सहभागी असतील त्यांच्या उत्तरपत्रिकांचे बंडल / पार्सल सोडवून बहिष्कार संपेपर्यत आपल्या कस्टडीमध्येच सुरक्षित ठेवावेत व बहिष्कार संपल्यानंतर परीक्षक / नियमक करून घ्यावेत. कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकेचे बंडल परत पाठवू नयेत.

**परीक्षा मंडळाच्या शिक्षासुची मधील परिशिष्ट भाग —1 (अ—6) (21) अन्वये मुल्यमापनासाठी परिरक्षक कार्यालयाकडुन पाठविण्यात आलेले उत्तरपत्रिकांचे पार्सल न स्विकारता परत केल्यास आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता रद्द करण्यात येईल तथा या कारणास्तव आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल राखीव ठेवण्यात येईल तसेच याबाबत कार्यवाही करण्याकरिता शिक्षण उपसंचालक यांना कळविण्यात येईल. याशिवाय महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम 1977 अन्वये नियम कं.67 (18) नुसार विभागीय मंडळाकडुन घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी कनिष्ठ महाविद्यालय जरूर त्या सर्व सोई व कर्मचारी वर्गाच्या सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपणावर आहे,याची स्पष्ट नोंद घ्यावी.**

तसेच संबधित शाळा प्राचार्य / मुख्याध्यापक सदरचे ईपीपी पार्सल ताब्यात न घेता मंडळाकडे उत्तरपत्रिकांचे पार्सल परत आल्यास त्यावर झालेला खर्च आपणाकडुन वसुल करून **संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालय(अनुदानित / विनाअनुदानित / अंशतः अनुदानित / स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील) संबधित शाळा कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल,याची स्पष्ट नोंद घ्यावी.**

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रत माहितीस्तव :

1) शिक्षण उपसंचालक नागपुर विभाग,नागपुर
2) सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जि.प.भंडारा / चंद्रपूर / नागपूर / वर्धा / गडचिरोली / गोंदिया.
4) अध्यक्ष / सचिव,संबधित संस्था.